# अध्ययन निष्पत्ती व क्षमता आधारित शिक्षण

Scanned with CamScanner

# अध्ययन निष्पत्ती : क्षमतांनुसार वर्गीकरण

## भाषा

| इयत्ता | अध्ययन निष्पत्ती | साध्य होणाऱ्या क्षमता |
|---|---|---|
| पहिली | विविध उद्देशांसाठी स्वत:ची भाषा किंवा शाळेतील माध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. | संभाषण |
| | चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूचे बारकाईने निरीक्षण करतात. | निरीक्षण, आकलन |

## गणित

| इयत्ता | अध्ययन निष्पत्ती | साध्य होणाऱ्या क्षमता |
|---|---|---|
| पहिली | वस्तूंचा आकार आणि लहान-मोठेपणा, घरंगळणे, घसरणे यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतो | वर्गीकरण, निरीक्षण, तुलना, आकार |
| | वस्तूंच्या, चित्रांच्या किंवा चिन्हांच्या सहाय्याने २० पर्यंतच्या सांख्याची नवे म्हणतो आणि मोजतो. | निरीक्षण, मोजणी |

Scanned with CamScanner

# अध्ययन निष्पत्ती आधारित – मुलनिहाय नियोजन प्रपत्र

| मुलनिहाय मासिक नियोजन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा- | | | | | महिना - | | |
| शिक्षकाचे नाव - | | | | | | | |
| विषय - | | | | | वर्ग - | | |
| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | महिन्यासाठी निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तीचे विधान | अध्ययन निष्पत्ती पूर्ततेतील निवडलेल्या क्षमता | क्षमता आधारित मदतीची गरज असणारी मुले | क्षमता प्राप्त होण्यासाठी आवश्यक उपक्रम / अनुभव | क्षमतानिहाय मूल्यमापन | निरीक्षणात्मक नोंदी |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

शिक्षण परिषदेमध्ये गटचर्चा करून माहिती भरावी (अ. क्र. ते निवडलेल्या क्षमता)

शिक्षण परिषदे नंतर शिक्षकांनी वैयक्तिकपणे भरावी. (मदतीची गरज असणारी मुले)

शिक्षण परिषदेमध्ये गटचर्चा करून माहिती भरावी (आवश्यक उपक्रम / अनुभव व क्षमतानिहाय मूल्यमापन)

शिक्षण परिषदे नंतर शिक्षकांनी वैयक्तिकपणे भरावी. (निरीक्षणात्मक नोंदी)

Scanned with CamScanner


# मुलनिहाय मासिक नियोजन - नमुना

| | |
|---|---|
| शाळा- | महिना - |
| शिक्षकाचे नाव - | |
| विषय - | वर्ग - |

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | महिन्यासाठी निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तीचे विधान | अध्ययन निष्पत्तीपूर्ततेसाठी आवश्यक क्षमता | क्षमताआधारित मदतीची गरज असणारी मुले | क्षमता प्राप्त होण्यासाठी आवश्यक उपक्रम / अनुभव | क्षमतानिहाय मूल्यमापन | निरीक्षणात्मक नोंदी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | MAR 306 | विविध लेखनसाहित्य समजपूर्वक वाचल्यानंतर त्यावर आधारित प्रश्न विचारतात, आपले मत देतात, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लेखी व तोंडी स्वरुपात देतात. | गोष्ट वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येतात. | प्राजक्ता<br>सोनल<br>विशाल | १. मुलांनी घरी/गावात/मित्रमैत्रिणींकडून ऐकलेल्या गोष्टी वर्गात सांगायला सांगणे. त्यापैकी एक गोष्ट फळ्यावर लिहून मुना वाचायला सांगणे किंवा वाचून दाखवणे. त्या गोष्टीवर किमान ३ ते ४ प्रश्न तयार करून उत्तरांवर चर्चा करणे.<br><br>मुलांनी लिहिलेल्या गोष्टी आणि प्रश्नांची सोडवलेली उत्तरे यांचा कागद मुलांच्या पोर्टफ़ोलिओमध्ये जोडावेत.<br><br>२. प्रत्येक मुलाला गोष्टीच्या पुस्तकातील एखादी गोष्ट मुलांना वाचायला सांगून त्यावर प्रश्न तयार करायला सांगणे. इतर २ मुलांनी ती गोष्ट वाचून प्रश्नांची उत्तरे सांगणे. गटात चर्चा करून मुलांनी तीनही गोष्टींवरील सर्व प्रश्नांची उत्तरे तपासणे. | वर्गातील इतर मुलांकडून (उदा: क्रांती) गोष्ट लिहून घेऊन त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहायला सांगणे. | गोष्ट सांगताना, प्रश्न विचारताना, उत्तर देताना मुलांचे निरीक्षण करून त्या नोंदी इथे करता येतील. |
| | | | मुलांच्या भोवतालच्या संदर्भाशी निगडीत विषयावरील प्रसंग, अनुभव वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येतात | क्रांती<br>राहुल<br>प्राजक्ता | नुकत्याच झालेल्या गावातील सण किंवा एखाद्या प्रसंगाबाबत चर्चा करून तो प्रसंग फळ्यावर लिहिणे. त्याबाबत मुलांना काही प्रश्न विचारून त्यावर उत्तरे विचारणे. | वर्गातील इतर मुलांकडून (उदा: विशाल) गोष्ट लिहून घेऊन त्यावरील प्रश्नांची उत्तरे सांगता येतात का ते पाहणे. | |
| | | | | | शाळा बंद असताना तुमचा अनुभव काय होता याबाबत मुलांमध्ये चर्चा घडवून आणणे. प्रत्येक मुलाने अनुभव सांगून झाल्यावर त्या मुलाला/मुलीला त्या अनुभवासंदर्भातील प्रश्न सुरुवातीला शिक्षकांनी विचारणे. मुलांपैकी कोणाला प्रश्न विचारायचे असल्यास प्रोत्साहन देणे. मुलांनी प्रश्न योग्य पद्धतीने विचारला आहे का याकडे लक्ष ठेऊन आवश्यकता भासल्यास मुलांना प्रश्न तयार करण्यासाठी मदत करणे. | शिक्षकांनी स्वतःचा एखादा अनुभव सांगून मुलांना त्याबाबत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे. | |
| | | | जाहिरात वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येतात, (मुलांच्या भोवतालच्या संदर्भाशी निगडीत विषयावरील) | प्राजक्ता<br>राहुल<br>सोनल<br>विशाल<br>सचिन<br>क्रांती | गावातील वर्तमानपत्रात किंवा इतरत्र दिसणाऱ्या जाहिरातीचा कागद / फोटो मुलांना दाखवून जाहिरातीच्या घटकांची मुलांना ओळख करून देणे :<br>१. जाहिरात कशाबाबत आहे ?<br>२. जाहिरात दुकानाबाबत असल्यास दुकानाचे ठिकाण कुठे आहे?<br>३. जाहिरातीत सवलत किंवा किंमत याचा उल्लेख असल्यास ते कसे समजून घ्यावे याबाबत चर्चा करणे. | | |

Scanned with CamScanner

# अध्ययन निष्पत्ती आधारित शिक्षण परिषद




Scanned with CamScanner